दिनांक 16/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 248

विषय - नगरपरिषद हद्दीतील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतीमधील वाचलनालयास पुस्तके, संगणक व सोई-सुविधा पुरविणे बाबत या कामास प्रमाणपत्र देणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ-1)मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 16/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी

2)महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, क्र. नपावै-2022/प्र.क्र.170(38)/नवि-16 दि.06/12/2022.

3) मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांचेकडील पत्र जा.क्र.0213/2023 दि.08/03/2023

संदर्भ क्र.2 नुसार विटा नगरपरिषद हद्दीतील वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाकडून 03 कामांसाठी 1.32 कोटी अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. सदरहू कामे करणेसाठी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यान्वयीन यंत्रणा आहे. संदर्भ क्र. 3 नुसार मा.उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग,विटा जि.सांगली यांनी विटा येथील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतीमधील वाचलनालयास पुस्तके, संगणक व सोई-सुविधा पुरविणे बाबत प्रमाणपत्र मागणी करणेत आलेली आहे. सदर कामाची जागा मालकी ही मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचे नावे नोंद आहे. सदर कामी जिल्हा परिषद यांचेकडून देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र घेणेत यावे. सदर कामाच्या नकाशास नगरपरिषदेने जा.क्र.3065 दि.24/01/2024 अन्वये मंजूरी दिलेली आहे. तरी सदर कामासाठी लागणा-या आवश्यक त्या शासकीय विभागांची परवानगी सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम) सांगली यांनी घेणेत याव्यात.

तरी विटा येथील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतीमधील वाचलनालयास पुस्तके, संगणक व सोई-सुविधा पुरविणे प्रस्तावित केलेले काम हे दि.06/12/2022 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे वैशिष्टयपूर्ण कामांसाठी विशेष अनुदान योजनेअंतर्गत करणे अनुज्ञेय असलेबाबतची सार्वजनिक बांधकाम विभाग, सांगली यांचेकडून खातरजमा करुन घेवून सदर कामास प्रमाणपत्र देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 16/02/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 249

विषय - नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत विविध विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ-1) मुख्याधिकारी यांनी नगरअभियंता यांची दिनांक 16/02/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2)मा.जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-211/2023 दि.17/05/2023

3)मा.जिल्हा सह आयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-4/कावि-164/2023 दि.17/05/2023

4) मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील दि.10/12/2023 रोजीचे पत्र.

संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये विटा नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर निधीतून प्रस्ताव पाठविणेबाबत कळविले आहे. संदर्भ क्र. 4 अन्वये मा.आमदार अनिल भाऊ बाबर विधानसभा सदस्य यांचेकडील पत्रानुसार सदर योजनेअंतर्गत कामे सुचविणेत आलेली आहेत.

सदर प्रस्ताव सादर करणेकरीता सुचवलेली कामे ही खालीलप्रमाणे.

1. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर ते घुमटमाळ येथील हनूमान चौक ते इंडस्ट्रीयल इस्टेट मार्गे खानापूर रोडला मिळणारा रस्ता खडीकरण, डांबरीकरण करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर येथील अंतर्गत बोळे कॉंक्रिटीकरण करणे.
3. विटा नगरपरिषद हद्दीतील फुलेनगर येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे.
4. विटा नगरपरिषद हद्दीतील आंबेडकरनगर येथील अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण करणे.
5. विटा नगरपरिषद हद्दीतील तासगांव रोड शिवसंगम मार्ग, फुलेनगर शाळा नं. 6 ते श्रीनगर तलावापर्यंत विद्युत पोल उभा करणे.
6. विटा नगरपरिषद हद्दीतील नेहरुनगर ते डॉ.लोखंडे हॉस्पीटल कडे जाणा-या रस्त्यालगत ओढयापर्यंत विद्युत पोल उभा करणे.

पान नं 2 वर

लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना 2023-24 अंतर्गत वरील काम क्र. 3 व 4 यांस प्रशासकीय ठराव क्र. 212 दि.28/12/2023 व काम क्र. 5 यांस प्रशासकीय ठराव 54 दि. 25/07/2023 अन्वये मंजूरी देणेत आलेली आहे. तरी काम क्र.1 यांस महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत व काम क्र. 2 व 6 या कामांस लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना 2023-24 अंतर्गत मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा